**नि.दि.दा.क्र. ८३/२०१५**
**मुरलीधर पाटील + १ विरुध्द हिम्मत पाटील +२**
**नि.क्र. ६८ चा भाग...**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी.</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नांव – संभाजी सिताराम पाटील,
वय – ७० वर्षे धंदा – शेतीमजुरी,
रा. छडवेल (प.), ता. साक्री, जि. धुळे.

**<u>सरतपास शपथेवर वादीतर्फे डी.व्ही. माळी, वकीलसाहेब</u>**

मी माझ्या शपथपत्रातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे माझ्या वकीलसाहेबांनी नोंदविला असून, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही असून तो **निशाणी क्र. ६८** वर आहे. यापुर्वी देखील मी माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले होते. सदरचे शपथपत्र हे **नि.क्र. १६** वर आहे. त्यामध्ये मी न्यायालयात अधिकचा सरतपास नोंदविला होता. त्यामध्ये काही दस्तांना निशाणी लावण्यात आलेल्या होत्या. प्रस्तुतचे शपथपत्र हे माझे यापुर्वी दाखल केलेल्या शपथपत्राच्या सोबत अतिरीक्त किंवा जोड शपथपत्र म्हणून पुराव्यात वाचण्यात यावे. तसेच त्यामधील अनुक्रमे **नि.क्र. १९ ते ३५** आहेत. आज रोजी मी शपथपत्रासोबत खालीलप्रमाणे दस्त दाखल करीत आहे.

| **अ.क्र.** | **दस्तावेजाचे विवरण** | **निशणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | वाद मिळकत पैकी मौजे छडवेल ता. सक्री | ६९ |

| | | |
|---|---|---|
| | येथील शेत गट क्र. ४५३/१ चा ७/१२ उतारा. | |
| २. | वाद मिळकत पैकी मौजे छडवेल (प.), ता. साक्री येथील शेत गट क्र. ४५३/२ चा ७/१२ उतारा. | ७० |
| ३. | वाद मिळकत पैकी मौजे छडवेल (प.)ता. साक्री, येथील शेत गट क्र. ४५२ चा ७/१२ उतारा. | ७१ |
| ४. | फेरफार नोंद क्र. २३२४ ची प्रमाणित प्रत. | ७२ |
| ५. | फेरफार नोंद क्र. २३४३ ची प्रत. | ७३ |

**सरतपास संपला.**

**प्रतिवादी यांचे विधिज्ञ श्री. एम.बी. साळुंके यांचे तोंडी विनंतीवरुन प्रकरण उलट तपासासाठी तहकूब करण्यात आले.**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

समक्ष

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2022.09.14 17:43:21 +0530

दिनांक : १४.०९.२०२२.

सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव : – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक : – १४.०९.२०२२.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३